# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता

प्रा. डॉ. बी. एस. नौकुडकर
कणकवली

## प्रस्तावना

भारतामध्ये वृत्तपत्रांचा प्रारंभ ब्रिटिशांनी केला. व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी वृत्तपत्राचे स्थान अनन्यसाधारण आहे. भारतात लोकशिक्षणाची सद्भावना हे ही वृत्तपत्र उदय, विकासाचे महत्त्वपूर्ण कारण आहे. इ.स.१९२० नंतर भारतीय वृत्तपत्र चळवळीला सामाजिक परिवर्तनाचे आयाम प्राप्त झाले. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा व्यापक अंगाने वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक अभिसरणाची एक प्रक्रिया सुरु झाली. पत्रकारिता जनता आणि शासनातील दुवा असल्यामुळे वृत्तपत्राने जनतेला राष्ट्राशी व राष्ट्राला जनतेशी जोडण्यास सुरुवात केली. या वृत्तपत्र चळवळीत इ.स.१९२० नंतर उपेक्षित समाजाचा उद्धार ही वृत्तपत्राची भूमिका निर्माण झाली असली तरी दलित समाजाच्या उद्धारासाठी पत्रकारितेचे माध्यम म्हणून वापरकरण्यास सुरुवात गोपाळबाबा वलंगेकर, शिवराज जानबा कांबळे यांनी केल्याचे दिसते. इ.स.१९१७ च्या साऊथ बरोकमिशनच्या समोर साक्ष देण्याच्या काळात अस्पृश्यांचा प्रश्नांना योग्य वाचा फोडणारे अस्पृश्याची कैफीयत मांडणारे वृत्तपत्र असावे असे आंबेडकरांना वाटले. पंखाशिवाय जसा पक्षी, त्याप्रमाणे समाजास विचारप्रर्वत करण्यासाठी वृत्तपत्राची गरज असते असे आंबेडकरांचे मत असल्याचे मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता (प्रबुद्ध भारत) या वृत्तापत्रांचा जन्म झाला.

## शोधनिबंधाचा उद्देश

१.डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजसुधारक, घटनातज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ म्हणून सर्वज्ञातच आहेत त्यांचा पत्रकारिता हा पैलू ही अभ्यासणे.
२.डॉ.आंबेडकरांच्या वृत्तपत्राचा व विचाराचा आढावा घेणे.
३.पत्रकारितेतून व्यक्त होणारे आंबेडकर अभ्यासणे. संशोधन पद्धती

## संधोधन पद्धती

प्रस्तूत शोधनिबंधासाठी विवरणात्मक, वर्णणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला असून यासाठी विविध संदर्भग्रंथ, तत्कालीन वृत्तपत्राच्या अंकाचे आदी स्त्रोताचा आधार घेतला आहे.

## गृहितकृत्य

१.डॉ.आंबेडकरांचे वृत्तपत्रातील लेखन सर्वसमावेशक असले तरी अस्पृश्योद्धार हा हीकळीचा मुद्दा होता.
२.शास्त्रीय विश्लेषण व बुद्धीप्रामाण्यवादाच्या आधारे आंबेडकरांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून समाज जागृती केली आहे.
३.सामाजिक धार्मिकता, समाजातील अयोग्यता, विशेषाधिकारचे अवडंबर नष्टकरणे आदी त्याच्या पत्रकारितेचे उद्देश होते.

## डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे

डॉ.आंबेडकरांची वृत्तपत्रे डॉ.आंबेडकरांनी आरंभी आपले वृत्तपत्रीय लेखन इंग्रजी वृत्तपत्रातूत केले होते. अनेक महत्त्वपूर्ण विषयावर त्यांनी आपल्या प्रगल्भ बुद्धीमत्तेच्या जोरावर विचारमंथनकेले होते.

परंतू इ.स.१९१७ नंतर त्यांना वृत्तपत्राची अपरिहार्यता जाणवली.' ३१ जाने १९२० रोजी 'मूकनायक' , ३ एप्रिल १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' तर १९३० मध्ये 'जनता' व जनतेचे रुपांतर १९५६ मध्ये 'प्रबुद्ध भारत' मध्ये करुन डॉ.आंबेडकरांनी पत्रकारितेच्या विश्वात आपले चिरंतन पाऊल उमटवले दिसते. 'बहिष्कृत भारत'चे ते स्वतः संपादक असल्याने त्यांचे या पत्रातील लेखन विपूल प्रमाणात आहे.

**डॉ. आंबेडकरांच्या वृत्तपत्रांची उद्दिष्टे**

१. डॉ.आंबेडकरांच्या वृत्तपत्राचे उद्दिष्टांमध्ये बहिष्कृत जातीमध्ये परिवर्तन व सुधारणाकरणे, अस्पृश्योद्धार त्याचप्रमाणे स्पृश समाजातही कालसापेक्ष सुधारणा अभिप्रेत होत्या.

२. तत्कालीन राजकीय नेते, त्यांची कार्यपद्धती, सामाजिक, राजकीय संघटना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी चाललेल्या चळवळी आदीची वस्तूस्थिती अग्रलेखनाच्या माध्यमातून व्यक्त करणे.

३. ब्रिटीश सरकारला अस्पृश्यांच्या गुलामी अवस्थेची जाणीव करुन अस्पृश्यामध्ये ही वैचारिक जागृती करणे.

४. पारंपारिक विषमतावादी हिंदूसमाजातील अनाचार, दांभिकपणा याला सडेतोड प्रत्युत्तर देणे व लोकशाहीनिष्ठ, सर्वसमावेशक समाजरचना हे हि आंबेडकरांच्या वृत्तपत्राचे उद्दिष्ट होते.

**वृत्तपत्राबाबत आंबेडकराची भूमिका व वृत्तपत्रातून व्यक्त होणारे आंबेडकर**

'गुळगुळीत कागदावर गुळगुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करणे वृत्तपत्राचे मुख्यकर्तव्य नाही ही वृत्तपत्राबाबतची भूमिका १९२० च्या दशकात निर्माण झाली होती. स्वातंत्र्यप्राप्तीचा नवा प्रवाह उदयास येवून वृत्तपत्राची प्रखरता वाढीस लागली होती. याच काळात डॉ.आंबेडकरांचा वृत्तपत्र प्रपंच सुरु झाला होता. वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृशोन्नती साधणे हा एकांगी उद्देश डॉ.आंबेडकरांचा दिसत नाही तर अस्पृश्य समाजाच्या जागृतीचा संदर्भ पूढे करुन स्पृशांनीही आपली मनोभूमिका बदलणे अगत्याचे आहे हा त्यांचा आग्रह होता, पत्रकारिता केवळ एक जात, समाज, वर्ग यांच्यापूरती मर्यादित नसते ती व्यापक असून समाजहित त्यात अपेक्षित असते असे आंबेडकरांचे मत होते. वृत्तपत्राकडे केवळ धंदा म्हणून पाहण्याच्या वृत्तीचा निषेध केल्याचे दिसते. डॉ.आंबेडकरांनी पुणे येथील रानडे व्याख्यान मालेत वृत्तपत्रासंबंधी विचार मांडताना म्हटले आहे. Journalism in India was one a profession. It has now become a trade. It has no more moral function than the manufacture of soap.' नैतिकता हा वृत्तपत्राचा कणा असावा हे आंबेडकरांचे मत होते तत्कालीनकाही वृत्तपत्राचा निषेधही आंबेडकरांनी केला आहे. महाराष्ट्रातील कित्येक वृत्तपत्रे अज्ञ लोकांना मूर्ख बनवण्याचे

कारखाने आहेत. त्यामूळे वृत्तपत्रांनी आपली आचारसंहिताजपणे अत्यावश्यक आहे. तसेच व्यक्ती पूजेचे अवडंबर न माजवता सत्याचा आश्रय घेवून नितीमत्तेचे पालन वृत्तपत्राच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. वृत्तपत्रे जाहीराती शिवाय पूर्ण होत नाहीत हे सत्य स्विकारुन जाहिरातीला कितपत महत्व द्यायचे याची संहिता वृत्तपत्राने नियमित करणे अगत्याचे आहे. त्याचप्रमाणे केवळ द्रव्यलोभास बळी पडून समाजविघातक औषधे, दारु इत्यादीच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. हा नितीमत्ता रसातळाला घालण्याचा प्रमाद आहे असे आंबेडकरांचे म्हणणे होते. लौकीक ऋणाच्या उद्देशाने वृत्तपत्राचा प्रपंच असावा. परोपकाराची भूमिका हि आत्मोन्नतीच्या दृष्टीने असावी समाजाची अवनत दशा सुधारणे हा व्यक्तीच्या लौकिक ऋणाचा भाग आहे आणि या ऋणातून मुक्त होण्यासाठी वृत्तपत्राचे कार्य उल्लेखनीय ठरते हा आंबेडकरांचा बुध्दी प्रामाण्यवाद होता, समाजोन्नती आणि लौकीक ऋण हा त्यांच्या पत्रकारितेचा कणाच म्हणावा लागेल.

डॉ.आंबेडकरांची पत्रकारीता जनसामान्य, अस्पृश्य, वंचीत यांना न्याय प्रदान करणारी होती.

लेखन प्रपंचाचा उद्देश समाजजागृती, समाजमत बनवणे, प्रबोधन हा होता या अनुषंगाने त्यांनी आपल्या लेखांची विचारांची जडणघडण वृत्तपत्रातून, अग्रलेखातून केली आहे. 'मूकनायक' च्या मुखपृष्ठावर त्यांनी संत तुकारामाच्या पुढील ओळी छापल्या होत्या.

काय करु आता धरुनिया भीड। निःशंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगी कोणी मुकि यांचा जाणे ।
सार्थ का लागत नव्हे हित ।।

अर्थातच आंबेडकराच्या 'मूकनायक' वृत्तपत्रामागील भूमिका म्हणजे तथाकथित समाजाच्या अव्यक्त, बंदिस्त व भयान अन्यायाची वाचा फोडणे ही होती, मूक समाजाला बोलतेकरण्याचा त्यांचा हा प्रयत्न होता.

इ.स. १९२७ मध्ये चवदार तळयाच्या माध्यमातून डॉ.आंबेडकरांच्या मानवी हक्काच्याकार्याची सुरवात झाल्यानंतर 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक डॉ.आंबेडकरांनी सुरु केले परंतू याचे स्वरुप मूकनायकापेक्षा काहीसे वेगळे दिसते. वैचारिक जागृतीकरणे या भूमिकेसोबतच आपल्या हक्कासाठी संघर्षात्मक पवित्रा यातून व्यक्त होतो. मूकनायकात ही शैली आढळत नाही. नवनिर्माणाचे नायक हा सूर मूकनायकात आढळतो तर रणांगणात उतरलेल्या योध्द्याचे रुप बहिष्कृत भारतातून व्यक्त होते.' 'महाराष्ट्रातील कित्येक वृत्तपत्रे अज्ञ लोकांना मूर्ख बनवण्याची कारखाने आहेत' असे त्यांनी 'बहिष्कृत भारत' च्या १२ ऑगस्ट १९२७ च्या अंकात म्हटले आहे तर ब्रिटीश राजवटीवरही अंग्लाई ही एक जळू आहे व ती हिंदूस्थानातील संपत्तीचे शोषण करते' या शब्दात १ जूलै १९२७ च्या अंकात आवाज उठवल्याचे दिसते अर्थातच स्वराज्य, स्वातंत्र्य हया ही आंबेडकरांच्या विचाराच्या महत्त्वपूर्ण बाजू होत्या परंतू स्वातंत्र्याच्या संकल्पनेत बहिष्कृत समाजाचे सर्वव्यापी सुरक्षित भवितव्य त्यांना अभिप्रेत होते. स्वराज्याचा संबंध आंबेडकरांनी सामाजिक समतेशी जोडला आहे. परंतू संत साहित्याचा, संत विचाराचा ही त्याच्या पत्रकारितेवर अत्यंत प्रभाव होता हे त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते. बहिष्कृत भारतच्या मुखपत्रावर संत ज्ञानेश्वराच्या ओळी असत.

आता कोंदड घेवूनन हाती । आरुढ पाइये रथी ।
देई अलिंगन वीरवृत्ती । समाधान ।।
जगीकीर्ति रुढवी । स्वधर्माचा मानु वाढवी ।
इया भारापासोनी सोडवी । मेदिनी हे ।।
आता पार्था निःशंक होई । या संग्रामा चित्र देई।
एक हे वाचूनिकाही । बोलो नये ।।

संतांची सर्वधर्मसहिष्णू वृत्ती, सर्वव्यापकता आणि मराठी साहित्यातील संतसाहित्याचे अद्वितीय स्थान आंबेडकर जाणून होते त्यामूळे त्यांच्या अनेक अग्रलेखात, लेखनात, भाषणात संताच्या अभंगाचा संतवचनाचा उल्लेख आढळतो.

'महापूरे झाडे जाती । तेथे लव्हाळी वाचती ।'
'विष्णुमय जग । वैष्णवाचा धर्म ।
भेदाभेद भ्रम । अमंगळ'

त्याचप्रमाणे 'भलेकुलवंत म्हणावे । तेही वेगी हजीर व्हावे ।
हजीर न होता कष्टावे । लागेल पूढे'.

यासारखी वचने त्यांच्या भाषणात लेखनात आढळतात. The untouchables who are they and why they became untouchables हा ग्रंथ त्यांनी नंदनार, रविदास व चोखामेळा या संताना अर्पण केल्याचे दिसते यावरुन त्यांच्या जीवनातील संतसाहित्याचे स्थान लक्षात येते.

इ.स. १९३० साली त्यांनी सुरु केलेल्य 'जनता' पाक्षिकाचा जन्म अल्पसंख्याकाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी नैतिक बळाची आवश्यकता असते या उद्देशातून झाला. तत्कालीन आधुनिक इतिहासातील सविनय कायदेभंग चळवळ, सत्याग्रहाचा प्रसार, गोलमेज परिषदा हि पार्श्वभूमीही या पाक्षिकाच्या उदयासाठी आवश्यक ठरल्याचे दिसते , 'गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा' म्हणजे तो बंड करुन उठेल, असे ब्रीदवाक्य लिहून जनतेची मांडणी केली गेली जनता मध्ये डॉ.आंबेडकरांनी नियमित लेखन केले

नसले तरी सामाजिक व शैक्षणिक प्रश्नासोबतच धर्मातराच्या संदर्भात त्यांनी मूलगामी व हदयस्पर्शी विचार मांडले.

४ फेब्रु. १९५६ रोजी जनता पत्राचे 'प्रबुद्ध भारत' असे नामांतर करण्यात आले. प्रबुध्द भारत मध्ये डॉ.आंबेडकरांची पत्रकारिता व्यक्त होण्यास फारसा अवकाश मिळाला नाही परंतु डॉ.आंबेडकराचा मूकनायक ते प्रबध्द भारत हा पत्रकारितेचा प्रवास म्हणजे पत्रकारितेच्या दृष्टीकोनातूनच नव्हे तर भारताच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकासाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. दलित चळवळीच्या इतिहासातच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या पर्वातीलही हे अनन्यसाधारण पर्व आहे.

## निष्कर्ष

१.परिवर्तनवादी दृष्टीकोन समोर ठेवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून तत्कालीन समाजव्यवस्था, समाजाची गरज, सामाजातील निरुपयोगी, कालबाहय तत्वे आणि राजकारण व स्वातंत्र्य आदी विषयाचे चपखल विवेचन आपल्या वृत्तपत्रातून मांडले आहे.

२.आत्मविश्लेषकता, प्रवाहित्व, समाजशास्त्रीय दृष्टीकोन, पोटभिरू वृत्तीवर टिका दंभस्फोटकता, उपरोधगर्भता व परखडपणा ही त्यांच्या पत्रकारितेची वैशिष्टये आहेत.

३.केवळ व्यवसाय हे पत्रकारितेचे स्वरुप नसावे तर लौकीक ऋण आणि आत्मोन्नती या पायावर पत्रकारितेची इमारत उभी असावी याचा आग्रह डॉ.आंबेडकरांनी केल्याचे दिसते.

४.अस्पृश्योत्रती हे एकच उद्दिष्ट त्यांच्या पत्रकारितेचे नसून समाजाचा उत्कर्ष, मानवी हक्क, स्त्रीउध्दार , समता, बंधूता याही बाबीवर त्यांनी तेवढाच प्रकाश टाकल्याचे दिसते.

५.विचाराची अद्वितीयता, समाजहिताची तळमळ आणि संत साहित्याच्या सर्वधर्मसहिष्णू वृत्तीचे दर्शनही त्यांच्या लेखनीतून घडूनयेते.

## संदर्भसूची

१.डॉ.गंगाधर पानतावणे- पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अभिजीत प्रकाशन नागपूर, १९८७ पृ.५६
२.रा.म.गर्गे-पत्रकार आणि पत्रकारीता, १९९९ पृ.८०
३.डॉ.नारायण कांबळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारीता आणि आजचे वास्तव (युगपुरुष डॉ.आंबेडकर,डॉ.डी.एम तंगलवाड, डॉ.आर.एन.सरौदे) २०१४ पृ.११०
४. डॉ.गंगाधर पानतावणे-उपरोक्त पृ.२३९
५. वर्तमानपत्रातील जाहिराती बा.भा.१६ ऑगस्ट १९२९
६. डॉ.गंगाधर पानतावणे उपरोक्त पृ.२४१
७. मूकनायक, मुंबई, वर्ष १ जले, ५ जून १९२० अंक.१०
८.यदुनाथ थत्ते- बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता, (संपा.शरणकुमार लिंबाळे- प्रज्ञा सूर्य ) दिलीपराज प्रका.२००७ पृ.३४
९. बहिष्कृत भारत, मुंबई १ जेलै १९२७
१०. बा.भा. दि.२० मे १९२७
११. डॉ.गंगाधर पानतावणे उपरोक्त पृ.६६
१२. कित्ता पृ.६६
१३. रा.के.लेले, मराठी वृत्तपत्राचा इति. पृ.७३३
१४.डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग ३
१५.मुन वसंत (संपा.) बहिष्कृत भारत आणि मुकनायक महाराष्ट्र शासन, प्रका.१९९०
१६. खैरमाडे चां.भ.डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खं